# अस्थिरता व आर्थिक आणिबाणीकडे वाटचाल

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, ॲक्ट – १९३४ हा कायदा भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी आहे, रिझर्व्ह बँकेचे काम या कायद्यानुसार चालते. भारतामधील चलन म्हणजेच नोटांवर नियंत्रण ठेवणे आणि देशाच्या संपूर्ण आर्थिक व्यवस्थेवर स्थैर्याच्या दिशने देशातील आम जनतेला विश्वस्त करणे हे काम रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला रोज करावे लागते. त्यामुळेच हा देश आर्थिकदृष्टया सिस्टीममध्ये चालू आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, ॲक्ट – १९३४ नुसार या देशात किती नोटा चलनात आणायच्या हे ठरविले जाते. थोडक्यात देशाची संपुर्ण आर्थिक नाडी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया च्या हातात आहे, त्यामुळे या देशातील प्रत्येक माणूस दैनंदिन आर्थिक व्यवहार करतो आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानेच ''डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशन्स'' ही कंपनी स्थापन केलेली आहे. व ही कंपनी डिपॉझिट इन्शुरन्स ॲक्ट १९६१ नुसार काम करते. तरी सुध्दा महाराष्ट्र शासनाने सहकारी पतसंस्थांसाठी सहकार कायद्याअंतर्गत **पतसंस्था डिपॉझिट गॅरंटी कॉर्पोरेशन** नावाने बेकायदेशीररित्या नोंदणी करून देऊन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियालाच उघडपणे आव्हान केले. आणि सरतेशेवटी हे तथाकथित बेकायदेशीर नोंदणी केलेले **पतसंस्था डिपॉझिट गॅरंटी कॉर्पोरेशन बुडाले.** राज्यातील अनेक पतसंस्थांना प्रत्येकी लाखो रूपयांना व्याजापासून मुकावे लागले. हेच सव्वाशे कोटी रूपये जर त्या पतसंस्थांनी कर्जरूपाने सभासदांना वितरीत केले असते तर, करोडो रूपयांचा आर्थिक फायदा होऊन पतसंस्थांना आर्थिक बळकट करता आले असते. ते मात्र या गॅरंटी कॉर्पोरेशनने म्हणजेच महाराष्ट्र शासनाच्या नोंदणी करण्याच्या कृतीमुळे थांबले. आणि असे असताना देखील रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, भारत सरकार, राज्य सरकार व त्यांचे संबंधीत सर्वेसर्वा ह्या प्रकरणी संबंधीतांवर कारवाईचा उच्चार सुध्दा करावयास तयार नाही, ही बाब अस्थिरतेकडे जाणारी आहे. एवढी गंभीर बाब जागेवर दाबली गेली.

देशातील सर्व बँका बँकिंग रेग्युलेशन, ॲक्ट – १९४९ अंतर्गत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया द्वारे १०० टक्के नियंत्रित आहेत. आणि विविध राज्यातील सहकारी बँकांवर **नाबार्ड** नावाची एजन्सी म्हणजेच **राष्ट्रीय बँक** ही **नोडल एजन्सी** म्हणून काम करते. तसेच महाराष्ट्र सहकारी कायदा – १९६० हा सहकारी संस्थांना लागू असलेला महाराष्ट्रातील सहकार कायदा आहे. वरील सर्व कायद्यांनुसार राज्यातील सहकारी साखर कारखाने व सुतगिरण्या व सहकारी पतसंस्था, तसेच सहकारी बँका यांचे नियंत्रण करताना **समान न्यायाची भुमिका न स्विकारल्यामुळे** महाराष्ट्र राज्यातील कोट्यावधी जनतेचे अब्जो रूपयांच्या ठेवी व भागांच्या रकमा असुरक्षित झाल्याचे चित्र राज्यभर पसरले आहे. राज्यातील १२ कोटी जनता, वर्तमानपत्रे, टी.व्ही. चॅनल तसेच थोर समाजसेवक, आजी माजी न्यायाधीश यांचेकडे आशेकडे बघत आहेत. कारण पतसंस्थांमध्ये केवळ ४००–५०० कोटी रुपये असुरक्षित झाले म्हणून पतसंस्थांमधील हजारो कार्यकर्त्यांना जेलमध्ये डांबून, त्यांचे संचालक मंडळ बरखास्त, करुन त्याठिकाणी प्रशासक नेमून, पतसंस्थांमधील संचालकांची स्थावर – अस्थावर मालमत्ता जप्त करण्यासाठी **कायद्याची अंमलबजावणी करणारे उन्मत्त झाले आहेत.** परंतु त्यांना सहकारी साखर कारखाने / सुतगिरण्या व बँका ज्यांचेमध्ये ५० हजार कोटीं रूपयांच्या वर जनतेचे पैसे असुरक्षित झालेले आहेत, त्यांचेवर काहीही कारवाई रिझर्व्ह बँक ऑफ इंडियासहीत कोणीही करीत नाही. एकाही संस्थेचे संचालक

मंडळ जेलमध्ये घातले जात नाही व त्यांच्या स्थावर – अस्थावर मालमत्ता जप्त केल्या जात नाहीत. तसेच त्यांना बँक Bank corrupt म्हणून घोषित करत नाही ही बाब देशाच्या आर्थिक अस्थिरतेकडे नेणारी आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, नाबार्ड, सहकार आयुक्त, साखर आयुक्त, सहकार सचिव, मुख्य सचिव, CID, CBI, व S.I.T. यांनी ह्या अस्थिरतेबद्दल वेळीच लक्ष घातले नाही तर, हा देश व देशामधील आम जनतेच्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांवर फार मोठे संशायाचे जाळे उभे राहू शकते. व याची सर्वस्वी जबाबदारी कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्यांवर जाऊ शकते. आणि त्यामुळे अस्थिरतेच्या पलीकडे ही अर्थव्यवस्था जाऊन आर्थिक आणीबाणीच्या दिशेने पाऊल पडू शकते. कारण रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व वर उल्लेखिलेल्या संस्था व महत्त्वाचे सर्वश्रेष्ठ अधिकारी सर्वांना समान न्यायाच्या भूमिकेतून वागविताना अलीकडच्या काळात दिसत नाही, ही बाब महाभयंकर व सर्वांचे आर्थिक अस्तित्व धोक्यात आल्याचे चिन्ह आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**